

# पवारांच्या स्वप्नपूर्तीसाठी नव्या पिढीची साथ हवी

**– गोविंदराव आदिक**

राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या प्रचंड अनुभवाचे व तात्विक बैठकीचे आणि प्रचंड कार्याचे अधिष्ठान सुरुवातीपासूनच पक्षाच्या पाठीशी मजबुतीने उभे राहिल्यामुळे गेल्या दहा वर्षांत राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष हा प्रचंड जोमाने विस्तारत जाऊन त्याचा अत्यंत अल्पावधीत मोठा वटवृक्ष झाला आहे. पक्षाची शिस्तबद्ध वाढ होण्याला शरद पवार यांचेच नेतृत्व मुख्यत्वे जबाबदार आहे.

श्री. शरद पवार यांच्याच मुळे राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाला सत्ता मिळते, याची जाणीव असल्यामुळे विरोधकांकडून सातत्याने खोटे-नाटे आरोप करून व टीकेची झोड उठवून पवार साहेबांना बदनाम करण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु पवार साहेबांचे नेतृत्व इतकं उत्तुंग व विशाल आहे की, असल्या शुद्र विरोधकांच्या टीकेला व खोट्या प्रचाराला ते कधीही भीक घालत नाहीत आणि त्याबद्दलचे खुलासेही करत नाहीत किंवा फिकीरही बाळगत नाहीत. पिढ्यान् पिढ्या मिळू न शकणारे असे हे हिमालयाएवढे उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे. त्याचा फायदा घेउन महाराष्ट्राने विकासाच्या दिशेने पुढे जाण्याची गरज आहे. स्वतंत्र महाराष्ट्राचे आद्य शिल्पकार म्हणून कै. यशवंतराव चव्हाण यांचा नेहमीच आदराने उल्लेख केला जातो. श्री. चव्हाण साहेबांबरोबरच श्री. वसंतराव नाईक आणि श्री. वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्राच्या विकासाची पायाभरणी केली. कृषी औद्योगिक समाजाची उभारणी करून या क्षेत्रात क्रांती करण्याचे स्वप्न कै.



**विधानसभा निवडणुका रंगात येऊ लागल्या आहेत. प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरू आहे. एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. बंडखोरांचे वादळ सर्वच पक्षांत घोंघावते आहे. आत्ता नाही तर पुन्हा कधीच नाही, अशी भावना व हवा सर्वत्र जोमाने वाहात असल्याने प्रत्येक जण इर्षेने पेटून विजयाच्या शिखरापर्यंत पोहोचण्यासाठी धडपडतो आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार गोविंदराव आदिक यांनी व्यक्त केलेली काही मते व विचार येथे आवर्जून नमूद करीत आहोत.**



*श्री. गोविंदराव आदिक यांची राज्यसभेत खासदार म्हणून निवड झाल्यानंतर त्यांचा प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई मुख्यालयात पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. त्यावेळी शेजारी मुनाफ हकीम, श्री. मंडलिक, हेमराज शहा व अन्य मान्यवर.*

चव्हाण साहेबांनी पाहून त्या दिशेने पावले टाकण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्याच मुशीत तयार झालेल्या शरद पवार साहेबांनी गेली चाळीस वर्षे अहोरात्र काम करून महाराष्ट्राचे स्वत:चे असे एक स्वतंत्र स्थान देशात निर्माण केले आहे. महाराष्ट्राचा आज देशभर उद्योगधंदे, सहकार, नगरविकास व अन्य क्षेत्रात नावलौकिक झालेला दिसतो, त्याचे सारे श्रेय श्री. शरद पवार यांना आहे.

त्यांनी उभ्या केलेल्या या इमारतीवर कळस चढवायचे काम अजून बाकी आहे. हे काम आता या पुढच्या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली तयार होत असलेल्या नवीन पिढीला करावयाचे आहे. त्यासाठी नवयुवकांनी मोठ्या ध्येयाने व कर्तव्यात कसूर नकरता पुढे येउन पवार साहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी व त्यांचे हात बळकट करण्याकरिता साथ करण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र हे देशामध्ये पुरोगामी राज्य म्हणून त्याचा सतत नावलौकीक राहिला आहे. परिवर्तनाच्या चळवळीमध्ये सुरुवातीपासूनच अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्राने देशाला कायम निरनिराळ्या क्षेत्रात अत्यंत निरपेक्षपणे मार्गदर्शन करण्याची भूमिका बजावली आहे. या पुढील काळात हे काम काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारच प्रभावीपणे पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली करू शकते, असा मला विश्वास वाटतो. आणि त्यामुळेच या विधानसभा निवडणुकीत या आघाडीला घवघवीत असे यश मिळायला हवे. तसे ते मिळाले नाही तर केवळ महाराष्ट्राचेच नुकसान होईल असे नाही, तर देशाचेही मोठे नुकसान होणार आहे. ते टाळायचे असेल तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आपापसातील आपले सर्व मतभेद व मानमरातब विसरून एकजुटीने व एकदिलाने खांद्याला खांदा लावून विश्वासाने काम केले पाहिजे.

शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांच्यासारख्या जातीयवादी पक्षांचे स्वरूप आता उघड झाले आहे. जनतेने त्यांना मागील तीनही निवडणुकांमध्ये झिडकारले आहे.



*खासदारपदी निवडून आल्यानंतर विजयाचा आनंद व्यक्त करताना गोविंदराव आदिक, हेमंत टकले, गुरूनाथ कुलकर्णी, डॉ. गजानन देसाई, दिनकर तावडे, हेमराज शहा व इतर मान्यवर.*

विरोधी पक्ष म्हणून त्यांनी ज्या प्रभावीपणे सचोटीने व कर्तव्यदक्षपणे आपली भूमिका बजवायला हवी होती त्या पद्धतीने त्यांनी काम केलेले नाही. त्यामुळे जनतेचा त्यांच्यावरती काडीचाही विश्वास राहिलेला नाही. धर्म, भाषा, जाती, प्रांत यांच्या नावाखाली भावनात्मक आवाहन करून समाजाला फसविण्याचे काम व पाप विरोधकांकडून सातत्याने घडत आहे. त्यामुळे त्यांच्यापासून जनतेने सावध राहण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्यांच्यातील अंतर्गत बंडाळीचे चित्र आपण सारे जण रोजच पाहतो आहोत. ज्यांना स्वत:चे घर सांभाळता आले नाही ते महाराष्ट्र काय सांभाळणार ? असा प्रश्न जर कोणी शिवसेनेच्या नेत्यांना विचारला तर ते काय उत्तर देउ शकतील, याचा आपण विचारच केलेला बरा.

या विधानसभा निवडणूकांमध्ये काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसला पुन्हा एकदा मजबुतीने सत्तेचा कलश आपल्या ताब्यात ठेवायचा असेल तर सेना-भाजपसारख्या जातीयवादी शक्तींना एकजुटीने व एकोप्याने काम करून ठेचून काढावे लागेल. त्याचवेळेला बंडखोरांनाही त्यांची जागा दाखवून द्यावी लागेल. पक्षाची शिस्त मोडून आपल्या नेतृत्वाला व पक्षाला कोणी अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत असेल, तर त्याला वठणीवर आणण्याचे कामही या पुढच्या काळात करावे लागेल. अपक्षांचा व बंडखोरांचा उद्याच्या घोडेबाजारात भाव वधारू द्यायचा नसेल, तर असे लोक कोणत्याही परिस्थितीत निवडून येता कामा नयेत. अशा प्रकारचे खंबीर धोरण स्वीकारून त्या दिशेने आपण सगळ्यांनी पावले टाकायला हवीत ! वास्तविक काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव करण्याची ताकत विरोधी पक्षात अजिबात नाही. आपलेच लोक अंतर्गत दुफळी माजवून घरभेदेपणा करतात म्हणून विरोधकांचे फावते. या वेळेला आपण विरोधकांना अणू-रेणू येवढी देखील मदत करायची नाही अशा निर्धाराने उभे राहिलो, तर दीडशे-दोनशे जागा जिंकणंही आपल्या दृष्टीने फारशी अवघड गोष्ट नाही.

■■■



# साध्या राहाणीची टूम व चीनच्या वाढत्या आक्रमकतेचे राजकारण

– विजय नाईक, नवी दिल्ली

केंद्रात १९७७-७९ दरम्यान जनता पक्षाचे सरकार होते, तेव्हाचा प्रसंग. पंतप्रधान मोरारजी देसाई होते.त्यावेळी साध्या राहाणीचा देखावा करण्याची मंत्र्यांमध्ये जणू स्पर्धा लागली होती. राजनारायण यांना आरोग्य मंत्रालय मिळालं होतं. त्यांनी अचानक सायकल वापरायला सुरवात केली. एके दिवशी सकाळीच ते विलिंग्डन उर्फ राम मनोहर लोहिया रुग्णालयात सायकलवर गेले. तेथील डॉक्टर्स व अधिकाऱ्यांना त्यांच्या आगमनाची माहिती नव्हती. राजनारायण यांनी एका भिंतीशेजारी सायकल ठेवली, अन् ते रूग्णालयाची तपासणी करायला गेले. डॉक्टर्स, अन्य कर्मचारी यांची भंबेरी तर उडालीच, ते थक्कही झाले. तपासणी झाली आणि बाहेर येऊन राजनारायण सायकल घेऊ लागले, तेव्हा, दोन्ही चाकातील हवा गेल्याचे त्यांना दिसले. हवा कुणी काढली, याची तत्काळ चौकशी सुरू झाली. थोड्याच वेळात सुरक्षाधिकाऱ्यानं वाहनतळावरील माणसाला धरून आणलं. आपली नोकरी जाणार, या विचारानं तो गर्भगळीत झाला होता. परंतु धीर धरून त्यानं कबूल केलं, की हवा आपणच काढली. यावर राजनारायण यांनी विचारलं, ''कारण काय?'' त्यानं सांगितलं, ''साहब भूल हो गयी, माफ करना, आपकी सायकल स्टँडपर नही थी. लोक किसीभी जगह गाडी, मोटर सायकल या सायकल पार्क करते है, तो उनकी हवा निकाल दी जाती है, क्यो की वो फिरसे ठीक जगह रखे. इसलिये सायकल की हवा निकाल दी.'' कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्याला पाहून राजनारायण यांनी माफ केलं. नंतर, हवा भरून ते बंगल्यावर परतले! त्याच काळात अडवानीही सायकलवरून संसदेला आले होते. ही टूम काही दिवस चालली आणि बंद झाली. लोकांना भुलविण्यासाठी काही दिवस असे देखावे चालतात, व पुन्हा ये रे माझ्या मागल्या सुरू होते.

गेल्या महिन्यात अशीच टूम अर्थमंत्री प्रणब मुकर्जी यांनी सुरू केली, अन् पाहता पाहता, काँग्रेसाध्यक्ष सोनिया गांधी, सरचिटणीस राहुल गांधी, तमाम मंत्रीगण यांनी त्यांचा कित्ता गिरवायाला सुरूवात केली. ते करताना मंत्र्यांना मानसिक व शारिरिक कष्टही झाले. परंतु देशातील दुष्काळग्रस्तांशी एकरूपता दाखविण्यासाठी हे सारे आवश्यक आहे, अशी जणू धारणाच झालेली. या टूमला

**अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी राजधानीत व देशात कोणत्याही शहराला देण्यात येणाऱ्या भेटीदरम्यान त्यांच्या वाहनांना सहज संचार करता यावा, म्हणून वारंवार हमरस्ते बंद केले जातात, हे आता जनतेच्या अंगवळणी पडले आहे. त्याबाबत सातत्याने नाराजीही व्यक्त केली जाते. परंतु सरकार व पोलिसांचा खाक्या बदललेला नाही. लाल दिव्याच्या गाडयांच्या ताफ्यामुळे सामान्य माणसाची भारी अडचण होते. त्यापेक्षा या व्यक्तींनी हेलिकॉप्टरचा वापर केल्यास लोक त्यांना दुवाच देतील. या विषयावरही बरेच चर्वितचर्वण झाले आहे, पण अद्याप मार्ग निघालेला नाही.**

स्पर्धात्मक स्वरूपही आले.

''साधी राहाणी व उच्च विचारसरणी''हा चांगला सुविचार असला, तरी गेली अनेक वर्ष काही अपवाद वगळता 'उच्च राहाणी व सामान्य विचारसरणी' याचाच अवलंब राजकीय नेते व नोकरशहा करीत आहेत. काही वर्षांपूर्वी पत्रकारांचा गट जर्मनीला गेला होता. बॉनमध्ये (त्यावेळी बर्लिन राजधानी नव्हती) परराष्ट्र मंत्रालयाच्या उच्चाधिकाऱ्याशी भेट ठरली होती. माहिती खात्यानेच ती ठरविली. आम्ही पत्रकार गाडीने ठरलेल्या स्थळी पोहोचलो, परंतु अधिकारी आलेला नव्हता. त्याबाबत विचारता माहिती अधिकाऱ्याने सांगितले, की सचिव साहेब सायकलवरून येत आहेत. त्यांचं निवासस्थान दहा कि.मी दूर आहे. ते गेली अनेक वर्षे सायकलनेच कार्यालयात येतात. रस्त्यात कदाचित 'ट्रॅफिक जॅम' असल्याने उशीर झाला असावा. थोड्याच वेळात ते आले. त्यांनी दिलगिरी व्यक्त केल्यावर आमची चर्चा सुरू झाली. आपल्या देशात याची कल्पना करता येईल काय? गेल्या वर्षी मी डेन्मार्कला गेलो होतो. तेव्हा, तेथे बव्हंशी मंत्री व नोकरशहा सायकलीने कार्यालयात येतात, असे समजले. प्रदूषण होऊ नये व व्यायामही व्हावा, हा दुहेरी हेतू त्यामागे असतो. युरोपातील अनेक देशात राजकीय नेत्यांनी साधी जीवनशैली केव्हाच अवलंबिली आहे. आपल्याकडे टूम काढून काही दिवस साध्या राहाणीचे प्रदर्शन केले, की साऱ्या वर्तमानपत्रात, दूरचित्रवाहिन्यांवर त्यांच्या हेडलाईन्स बनतात, उलटसुलट चर्चा सुरू होतात. 'अगा ऐसे घडिलेच नाही,' असा अचंब्याचा सूर सर्वत्र पसरतो. माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी त्यांच्या कारकीर्दीत दुष्काळांनंतर जनतेला एकवेळचे भोजन करण्याचे आवाहन केले होते. त्याला साऱ्या देशात प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. त्यात देखावा नव्हता, तर निग्रह होता.

परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा व राज्यमंत्री शशी थरूर यांच्या अनुक्रमे ताज पॅलेस व मौर्य शेरेटन या पंचतारांकित



हॉटेलमधील वास्तव्यावरून गदारोळ होण्यापूर्वीच मुकर्जी यांनी त्यांना तेथील आलिशान खोल्या सोडण्याचे आदेश दिले. त्यानंतर कृष्णा हे जवाहरलाल नेहरू विद्यापीठानजिक फॉरेन सर्व्हिसेस इन्स्टिट्यूटच्या अतिथीगृहात राहावयास गेले. व थरूर केरळ भवनमध्ये राहावयास गेले. परंतु,'' भवनात नीटनेटकेपणा नाही, स्वच्छता नाही, की व्यायामशाळा नाही,'' अशी जाहीर तक्रार थरूर यांनी केली. संसदेच्या रफी मार्गावरील विठ्ठलभाई पटेल हाऊसचे नूतनीकरण करण्यात आले असून, तेथे खासदार, मंत्र्यांसाठी पोहोण्याचा तलाव, व्यायामशाळा सारे काही आहे. त्याचा वापर थरूर यांना करता आला असता. विमानातील इकॉनॉमी क्लासला थरूर यांनी 'कॅटल क्लास' संबोधून ''सहकारी (होली काऊ) तेच करीत असल्याने आपल्याला पर्याय उरला नाही,'' असेही सांगून टाकले. ते स्पष्टवक्ते आहेत. राजकारणाला नवे आहेत. नावाजलेले साहित्यिक व आंतरराष्ट्रीय नोकरशहा आहेत. तथापि, राजकारणात बऱ्याचदा स्पष्टवक्तेपणा धोक्याचा ठरतो. मंत्रीपद हातातून निसटण्याचीही शक्यता असते. तो धोका पत्करून ते बोलले. कॉंग्रेसच्या प्रवक्त्या जयंती नटराजन यांनी त्याबाबत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. कॉंग्रेसच्या गोटानुसार, त्यांच्या ट्विटरवरील टिप्पणीने सामान्य प्रवाशांचा, व मुख्यतः १३ सप्टेंबर रोजी मुंबईला इकॉनॉमी क्लासने प्रवास केलेल्या पक्षाध्यक्षा खुद्द सोनिया गांधी यांचा अपमान झाला. तथापि, ७ रेसकोर्स मार्गावरील पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या इफ्तार समारंभात खुद्द डॉ मनमोहन सिंग यांनी थरूर यांची प्रतिक्रिया हसण्यावारी नेऊन, ''तो एक विनोद होता,'' अशी टिप्पणी केली. विशेष म्हणजे, कॉंग्रेसचे प्रवक्ते मनीश तिवारी यांनी दोन पावले पुढे जाऊन ''आम्ही 'कार्गोहोल्डमधूनही' प्रवास करावयास तयार आहोत,'' असे पत्रकार परिषदेत सांगितले होते. नंतर, २२ सप्टेंबर रोजी झालेली थरूर– सोनिया गांधी भेटीत सहकाऱ्यांना दुखविण्याचा आपला हेतू नव्हता, असे जाहीर केल्याने या



प्रकणावर पडदा पडला.'' त्यांची कानउघाडणी झाल्याने या विषयावर ते आता वाच्यता करीत नाही.

अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी राजधानीत व देशात कोणत्याही शहराला देण्यात येणाऱ्या भेटीदरम्यान त्यांच्या वाहनांना सहज संचार करता यावा, म्हणून वारंवार हमरस्ते बंद केले जातात, हे आता जनतेच्या अंगवळणी पडले आहे. त्याबाबत सातत्याने नाराजीही व्यक्त केली जाते. परंतु सरकार व पोलिसांचा खाक्या बदललेला नाही. लाल दिव्याच्या गाडयांचा ताफ्यामुळे सामान्य माणासाची भारी अडचण होते. त्यापेक्षा या व्यक्तींनी हेलिकॉप्टरचा वापर केल्यास लोक त्यांना दुवाच देतील. या विषयावरही बरेच चर्वितचर्वण झाले आहे, पण अद्याप मार्ग निघालेला नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'ऑस्टेरिटी' उर्फ साध्या राहाणीतील व्यवहार्य अडचणी सांगितल्या व नाराजीचा सूर व्यक्त केला. विमानातही फाईली हातावेगळ्या करण्याचे काम आपण करतो, व त्यासाठी व बसण्यास पुरेशी जागा हवी असल्याने उच्चश्रेणीच्या दर्जातून प्रवास उपयुक्त ठरतो, असे मत व्यक्त केले. परंतु प्रत्यक्षात त्यांनीही सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात मुंबई-दिल्ली प्रवास इकॉनॉमी दर्जातूनच केला. राहुल गांधी रेल्वेने लखनौला गेले. अन्य मंत्री स्पाईस जेट, इंडिगो एअरलाईन्स या 'लो कॉस्ट' विमानातून प्रवास करू लागले. त्यामुळे कदाचित या कंपन्यांना अधिक प्रतिष्ठाही प्राप्त झाली असेल. मुद्दा फक्त प्रवासाचा नाही, तर मंत्र्यांच्या महागड्या जीवनशैलीचा आहे त्याचा विचार व्हावयास हवा व तो करताना मंत्र्याच्या कामकाजाला अडचण निर्माण होईल काय? हेही पाहायला हवे. दिवसागणिक होणाऱ्या दहशतवादी कारवायांकडे पाहाता अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेला धोका पोहोचेल काय? मंत्र्यांबरोबर किती अधिकाऱ्यांनी प्रवास करावयाचा? आदी प्रश्नांचा विचार करून पंतप्रधानांनी व पक्षाध्यक्षांनी एक आचारसंहिता बनविली पाहिजे.

एडिटर्स गिल्ड ऑफ्‍ इंडियाने सप्टेंबरमध्ये आयोजित केलेल्या वार्तालापासाठी परराष्ट्र मंत्री कृष्णा यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांना हॉटेलमधील वास्तव्याविषयी प्रणब मुकर्जी यांच्या वक्तव्याबाबत विचारता, ते म्हणाले, की मला जे निवासस्थान देण्यात आले होते, त्यात सार्वजनिक बांधकाम खाते दहा पंधरा दिवसात डागडुजी करेल, असे वाटले होते. ''ते दोन, अडीच महिने लावतील, असे वाटले नव्हते. शिवाय हॉटेलमध्ये राहाण्याची मी खाजगी व्यवस्था केली होती. लौकरच मी २ त्यागराज मार्ग येथे राहावयास जाणार आहे,'' अशी पुस्ती त्यांनी जोडली. अर्थात खाजगी व्यवस्था कुणी केली होती, याबाबत त्यांनी बोलण्याचे टाळले. त्याचा तपशील येण्यास सुरूवात झाल्याने कृष्णा अधिक पेचात सापडण्याची शक्यता वाटते. परराष्ट्र मंत्र्याला कार्यालयाव्यतिरिक्त निवासस्थानी भेटावयास अनेक परदेशी पाहुणे येत असल्याने योग्य स्थळ आवश्यक होते, असाही एक मतप्रवाह. पक्षाचा नूर पाहून त्यांनीही परदेशप्रवासात अधिकाऱ्यांचा ताफा नेण्याचे बंद केले. डॉ मनमोहन सिंग यांनी काही महिन्यापूर्वी मंत्र्यांना आदेश दिले, की भारतीय कंपन्या, प्रतिष्ठाने यांनी परदेशात आयोजित केलेल्या कार्यक्रमांची आमंत्रणे स्वीकारू नयेत. फक्त संबंधित देशाकडून सरकारी आमंत्रण आल्यास पंतप्रधानांची परवानगी घेऊन त्यास उपस्थित राहावे. या आदेशाचे बव्हंशी पालन होत आहे. वस्तुतः मंत्र्यांनी साधेपणाने राहाण्याचा कित्ता गिरविला, तर त्याचे जनता स्वागतच करील. तथापि, त्यात निग्रहपूर्वक सातत्य असावे लागेल, व जनतेला त्याचा प्रत्येक वेळी प्रत्यय यावा लागेल. परिणामतः सरकारचे व पर्यायाने जनतेचे पैसै वाचतील. पंतप्रधान व राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठी एअर इंडियाचे जंबो विमान वापरले जाते, शिवाय स्टँडबाय विमानांचे आयोजन केले जाते. त्यात काही कपात होणार आहे काय? युरोपीय देशातील अनेक राष्ट्रप्रमुख बिनबोभाट इकॉनॉमी दर्जाने प्रवास करतात. त्यांची साधी राहाणी तेथील जनतेच्या अंगवळणी पडली आहे.

या संदर्भात दोन गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत. दिल्लीत मंत्री व खासदारांना राहाण्यासाठी दोन ते चार एकराचे बंगले आहेत. ते ल्यूटेनच्या दिल्लीत आहेत. ते पाडून त्याऐवजी उंच इमारती बांधाव्या, असाही प्रस्ताव काही वर्षांपूर्वी आला होता. काही दिवस त्यावर उलटसुलट चर्चा होऊन, पुन्हा तो बासनात पडला. कारण ल्यूटेन्सच्या दिल्लीचे एक विशिष्ट स्थापत्य आहे. त्यात गगनचुंबी इमारतींना वाव नाही. या स्थापत्याने पर्यावरणाचेही उद्दिष्ट साधते. ल्यूटेन्सच्या परिघाबाहेर नंतर पंतमार्गावर

खासदारांच्या निवासासाठी उंच इमारती बांधण्यात आल्या. ल्यूटेन्सच्या दिल्लीतील एकमजली आलिशान बंगल्यांना मात्र धक्का लागलेला नाही. देशातील गरीबीकडे पाहाता राष्ट्रपती भवनातील साडे तीनशे खोल्यांची एका माणसाला (राष्ट्रपतीला) गरज आहे काय, असाही प्रश्न काही वर्षापूर्वी चर्चेस आला होता. ''राष्ट्रपती भवनाचे पंचतारांकित अथवा सप्ततारांकित हॉटेलमध्ये रूपांतर करावे,'' अशा सूचना आल्या. पुन्हा उलटसुलट चर्चा व पुन्हा जैसे थे झाले. निवासस्थानात जाण्यापूर्वी, मंत्री, खासदार आपापल्या बंगल्यांचा कायापालट करतात, व नंतरही तो चालू राहातो. समाजवादी पक्षाचे सरचिटणीस अमर सिंग यांनी लोधी मार्गावरील बंगल्याचा बेकायदेशीर कायाकल्प केला, यावरून काही महिन्यांपूर्वी बराच वाद झाला होता. त्याविरूद्ध कोणतीही कारवाई झाली, नाही कारण केंद्रातील सरकारला त्यांच्या सरकारने बिनशर्त पाठिंबा दिला आहे. केरळातील कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते करूणाकरन संसद सदस्य असताना त्यांनी दिल्लीतील सुनहरी मार्गावरील निवासस्थानी पोहोण्याचा तलाव बांधून घेतला. पण नेहरूंच्या काळात त्यावेळचे मंत्री शामनंदन मिश्रा यांच्या भाग्यात तो नव्हता. ती घटना अशी. नेहरू यांनी मिश्रा यांना नियोजनमंत्रीपदी नेमले. नव्या निवासस्थानी गेल्यावर मिश्रा यांनी सार्वजनिक बांधकाम खात्यांच्या अधिकाऱ्यांना बंगल्यात पोहोण्याचा तलाव बांधण्याचे आदेश दिले. तेव्हा अधिकाऱ्यांनी ''तशी तरतूद नाही,'' असे कळविले. शामबाबूंचा पारा चढला आणि त्यांनी थेट नेहरूंना पत्र लिहून, ''अधिकारी आदेशाचे पालन करीत नाही,'' अशी तक्रार केली. त्यावर नेहरूंनी केवळ दोन ओळींचे उत्तर त्यांना पाठविले. त्यात नेहरूंनी शामबाबूंना कळविले, '' तुम्हाला मंत्रीपद हवे आहे, की पोहोण्याचा तलाव, याची निवड तुम्हीच करावी.'' शामबाबूंनी अर्थातच मंत्रीपदाला प्राधान्य दिले!!

यापूर्वी राजीव गांधी यांच्या कारकीर्दीत जोरदार चर्चा झाली होती, ती त्यांचे स्नेही व केंद्रीय पेट्रोलियम खात्याचे मंत्री सतीश शर्मा यांच्या महागड्या राहाणीबाबत. त्यांच्या निवासस्थानी त्यांनी इटालियन टाईल्स व फर्निचर वापरल्याच्या बातम्या येत. त्यावरून वादंगही झाले. तथापि, पुढे त्याकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही. गेल्या काही वर्षात बाजारामध्ये अनेक स्कॅंडिनेव्हियन, इटालियन, अमेरिकन कंपन्याची फर्निचर, टाईल्सपासून असंख्य ग्रहोपयोगी वस्तूंची आलिशान दुकाने देशभर पसरली असून, त्यातील वस्तू उच्च मध्यमवर्गीयांच्या घरातून दिसू लागल्या आहेत. त्यामुळे आता इटालियन टाईल्सचे अप्रूप राहिलेले नाही. परंतु, राजकीय नेत्यांतर्फे घर अथवा कार्यालयाला सजविण्यासाठी अशा इंपोर्टेड वस्तू व मालाचा होणारा भरमसाठ वापर व त्यावर होणारा सरकारी खर्च निश्चितच अनेक प्रश्न उपस्थित करतो. साधी राहाणी असलेल्या केंद्रीय नेत्यात रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांचा व माजी मंत्री लालू प्रसाद यादव व जॉर्ज फर्नांडिस यांचा समावेश करावा लागेल. फर्नांडिस हे समाजवादी. जनता सरकारमध्ये उद्योगमंत्री असताना त्यांनी कधीनव्हत एकदा 'टाय' घातला होता. तेव्हा समाजवादी चळवळीच्या नेत्या



इंदुताई टिळक यांनी त्यांना इतके खडसावून पत्र लिहिले होते, की तेव्हापासून फर्नांडिस यांनी कायमचे टाय घालणे कायमचे सोडून दिले !!

राहुल गांधी यांच्या दिल्ली ते लुधियाना ते दिल्ली या शताब्दि एक्स्प्रेसमधून केलेल्या प्रवासाला भरमसाठ प्रसिद्धी मिळाली, ती गाडीवर झालेल्या दगडफेकीमुळे. त्याचे अनुकरण युवक काँग्रेसचे नेतेही करतील. पण या प्रवासापाठोपाठ तामिळ नाडूच्या तीन दिवसांच्या गांधी यांच्या दौऱ्यासाठी एक कोटी रूपये खर्च झाल्याची 'द हिंदू' ने प्रसिद्ध केलेली बातमी बोलकी आहे. या दौऱ्यात त्यांच्या भोवती खास अंगरक्षकांचे कोंडाळे होते, ते वेगळेच. त्यांचा सारा प्रवास हेलिकॉप्टरने झाला. त्याचे बिल युवक काँग्रेसने भरले. ते सरचिटणीस असूनही त्यांना दिल्लीतील तुघलक मार्गावर आलिशान बंगला देण्यात आला आहे. या प्रकारचा बंगला केवळ केंद्रीय मंत्र्यासाठी राखून ठेवलेला असतो. त्यामुळे त्यांच्या साधी राहाणी व उच्च राहाणी या दोन्हीतील फरक जनतेसमोर यावा. दुष्काळाचे सावट संपेपर्यंत तरी काँग्रेस नेत्यांचा निर्धार टिकणार काय, हे पाहावयाचे. वरकरणी या दिसणाऱ्या साध्या राहाणीचा भंपकपणा अथवा निग्रह लौकरच जनतेपुढे येणे अगत्याचे ठरेल.



दरम्यान, येथील राजकीय वर्तुळात सातत्याने चालणाऱ्या पाकिस्तानविषयीच्या चर्चेत आता भर पडली आहे, ती चीनच्या आक्रमकतेची. जुलै २००९ मध्ये मी चीनला भेट दिली, त्यावेळी बिजिंग येथे परराष्ट्र मंत्रालयाचे आशिया विभागाचे अधिकारी सन वेडाँग यांच्याबरोबर झालेल्या भेटीत ते म्हणाले, की १९६२ पूर्वी 'हिंदी चीनी भाई भाई' चे वातावरण होते, तसे पुन्हा निर्माण होणे शक्य नाही. गेल्या ४७ वर्षात दोन्ही देशांनी केलेली आर्थिक घोडदौड पाहाता व सीमेचा प्रश्न बाजूला ठेऊन परस्पर सहकार्यात केलेली प्रगती पाहाता पंचशीलमधील तत्वांशीच कटिबद्ध राहावे लागेल. भारतावर हल्ला करण्याचा चीनचा कोणताही विचार नाही,'' असेही वेडाँग म्हणाले होते. विरोधाभास म्हणजे, अलीकडे वातावरण तापले, तेव्हा चीनचे मुंबईतील नवे कॉन्सुल जनरल वाँग डोंगहुआ हे राज्यपाल एस.सी.जमीर यांना भेटून (१५ सप्टेंबर) सांगत होते, ''भारत व चीन केवळ शेजारी नाहीत, तर भावंडं आहेत.'' कुणाचे खरे मानायचे? भारत व चीन दरम्यान व्यापाराने, भारत -अमेरिका व्यापाराला मागे टाकले असून, २००९ मध्ये ५० अब्ज डॉलर्सचे लक्ष्य साधले आहे. ते २०१० पर्यंत ६० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे लक्ष्य आहे. सीमाप्रश्नाबाबत वाटाघाटीच्या तेरा फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. इंदिरा गांधी यांच्या कारकीर्दीत सिक्कीमला भारताचे २२ वे राज्य म्हणून १६ मे १९७५ रोजी संलग्न करण्यात

आले, तेव्हा चीनने निषेध नोंदविला होता, व हा प्रदेश भारताचा अविभाज्य प्रदेश मानण्याचेही नाकारले होते. परंतु तब्बल तीस वर्षांनंतर अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना चीनने ते मान्य केले. तथापि, अरूणाचल प्रदेशावरील दावा चीनने सोडलेला नाही. अलीकडील काळात दोन्ही बाजूचे संबंध सुधारल्याने सिक्कीमचे मुख्यमंत्री पवनकुमार छामलिंग यांनी सिक्कीम सीमेवरून भारत-चीन व्यापारमार्ग खुला करण्याची मागणीही केली आहे. १९६२ पूर्वी नथू ला सीमेवरून तो होत होता. तेथून भारतीय व्यापारी तिबेटला जात व मालाची देवाणघेवाण करीत. दोन्ही देशात एकीकडे मैत्रीवर्ष साजरे केले जात असताना सीमेवरील वाढणारा तणाव निश्चितच चिंता निर्माण करणारा आहे. दलाई लामा यांची तवांगची भेट चीनला मान्य नाही. तर ''अरूणाचल प्रदेश भारताचे अविभाज्य अंग असल्याने दलाई लामा यांना तेथे जाण्यास मनाई करता येणार नाही,''अशी ठाम भूमिका परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा यांनी जाहीर केल्याने चीन काही प्रमाणात चेकाळल्यासारखे वागताना दिसतो. बीजिंगच्या माझ्या भेटीत, चीनच्या अधिकाऱ्यांनी ऑलिंपिक ज्योतीच्या सुरक्षित प्रवासाबाबत भारताची प्रशंसा केली होती. '' प्रक्षुब्ध तिबेटी निदर्शकांना भारताने चांगले हाताळले,'' असेही मत त्यांनी व्यक्त केले होते. तसेच, परस्पर गुंतवणुकीचे प्रमाण वाढले आहे, याबाबत समाधान व्यक्त केले होते. हे वातावरण गेल्या काही दिवसात काहीसे गढूळ झाले, याला बऱ्याच प्रमाणात चीनी सैनिकांची घुसखोरी हे होय.

संरक्षण मंत्रालयातून देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, २००८ मध्ये ईशान्य राज्यातील पश्चिम, मध्य व पूर्व सीमेचे चीनी सेनेने २७० वेळा उल्लंघन केले, तसेच २२८५ वेळा आक्रमक गस्त घातली. हेच प्रमाण २००९ मध्ये अनुक्रमे ६० व ४१३ असे असून, अद्याप वर्ष संपलेले नाही. बाटांग-ला व भारत-भूतान-चीन सीमेवर प्रत्यक्ष ताबा रेषेनजिक घुसखोरीच्या घटना घडत आहेत. तसेच लडाखमधील पाँगोन त्सो या अतिविशाल



तलावानजिकच्या भारतीय हद्दीतील खडकांवर चीनी सैनिकांनी लाल रंगाने 'यलो रिव्हरचे पात्र'अशी अक्षरे कोरल्याची घटनाही अलीकडे घडली. अर्थात दृकश्राव्य वाहिन्यांसाठी हा सनसनाटी विषय असल्याने त्यांना काही दिवस चोवीस तास त्यावर चर्चा चालू ठेवली. त्यामुळे चीन व भारत युद्धासाठी उभे ठाकल्याचे चित्र निर्माण झाले. ड्रॅगनचा केव्हाही फुत्कार करील, अशी शंका देशपातळीवर निर्माण झाली. त्याचे खंडन खुद्द पंतप्रधान डॉ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एम.के.नारायणन व परराष्ट्र सचिव निरूपमा राव यांना करण्याची वेळ आली. गेल्या वर्षापेक्षा यंदा सीमेचे उल्लंघन घटले आहे, असे डॉ सिंग यांनी सांगितले. तर सेनाप्रमुख दीपक कपूर यांनी, ''काळजी करण्यासारखे काही नाही,'' अशी टिप्पणी १९ सप्टेंबर रोजी केली. संरक्षणविषयक तज्ञ ब्रम्ह चेलानी यांच्या मते, याच प्रकारच्या चकमकी १९८६-८७ मध्ये झाल्या होत्या. त्यानंतर प्रथमच वातावरण चिघळले आहे. बीजिंगमध्ये चीन सरकारच्या प्रवक्त्या जियांग यू यांनी ''भारताकडे आम्ही प्रतिस्पर्धी अथवा शत्रू या नजरेने पाहात नाही,'' असे मत १५ सप्टेंबर रोजी व्यक्त केले. ''माध्यमांनी अतिशयोक्त वृत्त देऊ नये,'' असे आवाहन सरकारतर्फे करण्यात आले. चीनच्या गोळीबारामुळे भारतीय जवान जखमी झाल्याचे वृत्त 'द टाईम्स ऑक्त इंडिया'ने दिले होते. हे वृत्त ज्यांनी दिले, त्या दोन पत्रकारांविरूद्ध गृहमंत्रालयाने गुन्हा दाखल करण्याचे ठरविले होते. परंतु गृहमंत्री चिदंबरम यांनी कारवाई रद्द केली. चीन, नेपाळला आपलेसे करू पाहात आहे. माजी पंतप्रधान प्रचंड उर्फ पुष्पकमल दहल यांचा भारतविरोधी प्रचार दिवसेंदिवस विखारी होत आहे. काठमांडूमध्ये पशुपतीनाथ मंदिरातील राघवेंद्र व गिरिश भट या दोन भारतीय पुजाऱ्यांवर हल्ला करण्यामागेही माओवादी असल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे पाकिस्तानबरोबर चीनची घनिष्ट मैत्री तर आहेच, चीनने बलुचिस्तानच्या किनाऱ्यावरील ग्वादार येथे भलेमोठे बंदर उभारण्याचा प्रकल्प पूर्ण केला आहे. पाकिस्तानच्या अण्वस्त्र निर्मितीला साह्य केले आहे. पाकिस्तानबरोबर असलेल्या संबंधांबाबत बीजिंगच्या भेटीत



विचारता, सन वेडाँग म्हणाले होते, की ही मैत्री भारताविरूद्ध नाही. तथापि, अण्वस्त्रप्रसारास जबाबदार पाकिस्तानी शास्त्रज्ञ ए.क्यू. खान यांनी २० सप्टेंबर रोजी केलेल्या गौप्यस्फोटामुळे पाकिस्तान व चीनचे पितळ उघडे पडले आहे. त्यानुसार, खान यांनी अण्वस्त्रनिर्मितीसाठी लागणारे गोपनीय आराखडे, माहिती व सामुग्री चीन, इराण, उत्तर कोरिया व लीबिया या राष्ट्रांना पुरविली. एवढेच नव्हे, तर चीनमधील हांगझाँग येथे पाकिस्तानने सेंट्रफ्युज कारखाना उभारला व त्याबदल्यात चीनने पाकिस्तानला अण्वस्त्रांचे आराखडे, ५० किलो समृद्ध युरेनियम, व अन्यप्रतींचे १५ किलो युरेनियम दिले. हे सारे दबावाखाली करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वॉशिंग्टनहून आलेल्या वृत्तानुसार, ''अमेरिकन गुप्तचर संघटनांना याची पूर्ण माहिती होती, तरीही त्यांनी त्याकडे डोळेझाक केली.'' याचा अर्थ, अमेरिका व भारत मित्रराष्ट्रे असली, तरी अमेरिकेची बव्हंशी धोरणे भारताविरूद्ध गेली आहेत, हे स्पष्ट होते. ''अमेरिकेकडून मिळणारे अर्थसाह्य व लष्करी मदतीचा भारताविरूद्ध वापर करण्यात आला, अथवा साह्य वळविण्यात आले,'' असे जनरल मुशर्रफ यांनी कबूल केले. नंतर ते बदलले ही बात अलाहिदा. पाकिस्तानचे अध्यक्ष असीफ अली झरदारी यांचे सरकार आल्यावर अमेरिकेनेच मुशर्रफ यांना सुरक्षित आश्रय दिला. आजही ते तेथे आहेत. ''मुशर्रफ यांच्या वक्तव्यांची अमेरिकेने गंभीर दखल घेतली आहे,'' असे अमेरिकेचे भारतातील राजदूत टिमोथी रोमर यांनी मुंबई भेटीत म्हटले असले, तरी त्यात फारसे तथ्य नाही. ''दखल किती गंभीरपणे घेतली जाईल व पाकिस्तान व मुशर्रक्त यांच्याविरूद्ध काय कारवाई केली जाईल,'' याबाबत अमेरिकेचे प्रवक्ते मूग गिळून आहेत. मुंबईवर हल्ला होऊन येत्या ऑक्टोबरात एक वर्ष पूर्ण होईल. परंतु ना कसाबला फारशी देण्यात आली, ना या कटामागील एकाही दहशतवाद्यावर पाकिस्तानने कारवाई केली. जामत उद दवाचा म्होरक्या हाफीज सईद याच्यावर कारवाई केल्याचे केवळ नाटक पाकिस्तान करीत आहे.



दरम्यान, गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी वॉशिंग्टनला दिलेल्या भेटीत सीआयए, एक्त बीआयच्या अधिकाऱ्यांशी चर्चा

केली. तेथील दहशतवाद प्रतिबंधक केंद्राला त्यांनी भेट दिली. त्या धर्तीवर भारतात दहशतवाद प्रतिबंधक राष्ट्रीय केंद्र उभारण्याचे ठरले. पंतप्रधान डॉ सिंग अध्यक्ष बराक ओबामा यांना पीट्सबर्गमध्ये झालेल्या जी-२० गटाच्या शिखर परिषदेत २५ सप्टेंबर रोजी भेटले व लौकरच वेगळ्याने भेटावयास वॉशिंग्टनला जाणार आहेत. त्यातून काय निष्पन्न होणार, हे कळेलच. प्रत्येक वेळी पाकिस्तानला समज देण्यासाठी भारताला अमेरिकेची मनधरणी करावी लागावी, हे निराशाजनक होय. खुद्द डॉ सिंग हेच आठवड्याला एकदा तरी इशारा देत आहेत, की भारतावर लष्कर-ए-तैयबा प्रचंड हल्ला करण्याच्या तयारीत आहे. तो रोखण्यासाठी सरकार काय पावले टाकीत आहे?



पाकिस्तानबरोबर असलेला संयुक्त दहशतवाद प्रतिबंधात्मक गट केव्हाच ठप्प झालाय. अशा परिस्थितीत हल्ल्याची वाट पाहाण्याशिवाय जनतेच्या हाती काय आहे? शिवाय तो झाला, तर त्यात भरडली जाणार शेवटी जनताच व त्या विरूद्ध लढणारे काही पोलीस, जवान इत्यादी. राजकीय नेते नेहमीच सही सलामत सुटतात. कारण त्यांच्याभोवती असलेले कमांडोंचे सुरक्षाकवच. जनतेला वाचविण्यासाठी आवश्यक असलेली पोलिस यंत्रणा जुन्यापुराण्या बंदुका घेऊन फिरते आहे. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या गृहमंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सध्या देशात १० हजार व्यक्तींमागे केवळ १४.५ पोलीस आहेत. हे प्रमाण किमान २२ पोलीस, असे असले पाहिजे. वीस वर्षात त्यांचे एकदाच प्रशिक्षण होते. ते किमान पाच वर्षांनी व्हावयास हवे. ९९ हजार पोलिसांना २००४ मध्ये प्रशिक्षण मिळाले होते. २००५ मध्ये ६९ हजार तर २००६ मध्ये केवळ ५१ हजार पोलिसांना प्रशिक्षण मिळाले. गृहमंत्रालयानुसार, ''पोलिसांची संख्यावाढ व त्यांच्या प्रशिक्षणासाठी २५,८०८ कोटी रू. लागतील.'' त्यांच्या शस्त्रास्त्रांच्या आधुनिकीकरणाचे प्रस्ताव जणू बासनात गुंडाळून ठेवण्यात आले आहेत. कोणत्याही दहशतवादी हल्ल्याला तोंड देण्याची जय्यत तयारी सरकारने ठेवल्याचे गृहमंत्री पी.चिदंबरम यांनी म्हटले आहे, तोच काय दिलासा. डॉ सिंग यांच्यानुसार, ''नक्षलवादाचे सर्वात मोठे आव्हान देशापुढे आहे.'' त्याचे पारिपत्य करण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना अमलात आलेली नाही. सरकारने आता लष्कराला पाचारण करण्याचे ठरविले असले, तरी जोवर त्यांच्या व त्यांना साथ देणाऱ्या आदिवासी लोकांच्या सामाजिक प्रश्नांना सरकार हात घालीत नाही, तोवर हे आव्हान वाढण्याची शक्यता अधिक.

■■■



# अडवाणी-विजेंदरसिंग-सोमदेवने घडविला नवा इतिहास ... !

**- मुकुंद मोघे**

**मागोवा क्रिडाविश्वाचा**

श्रीलंकेत झालेली तिरंगी क्रिकेट स्पर्धा जिंकून भारतीय क्रिकेट संघाने पटकावलेला 'कॉम्पॅक करंडक', 'अॅशेस' मालिकेत अनपेक्षितरीत्या पराभूत झाल्यानंतर सात एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत मात्र ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर केलेली ६-१ अशी सहज मात. अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत लागलेले काही खळबळजनक निकाल, डेव्हीस करंडक स्पर्धेच्या पात्रता फेरीत भारताच्या युवा टेनिसपटूंनी दक्षिण आफ्रिकेचा केलेला पराभव आणि आपला अव्वल बिलियर्डपटू पंकज अडवाणीने मिळविलेले जागतिक अजिंक्यपद ही गेल्या महिन्यातील क्रीडाविषयक घडामोडींची काही प्रमुख वैशिष्ट्ये ठरली. सामान्यतः संपूर्ण वर्षभर या ना त्या स्पर्धेत सतत खेळणारे भारतीय क्रिकेटपटू गेले काही दिवस 'ऑफ सिझन'चा आनंद लुटत होते. त्यांच्या या विश्रांतीची अखेर आणि नव्या 'हंगामांची सुरुवात झाली ती श्रीलंकेत खेळल्या गेलेल्या तिरंगी क्रिकेट स्पर्धेने. यजमान श्रीलंका- भारत व न्यूझीलंड या तीन संघांदरम्यानची ही स्पर्धा जेमतेम तीन सामन्यांची होती. त्यात न्यूझीलंडची कामगिरी तर साफ निराशाजनक झालीच परंतु भारतालाही प्रारंभिक सामन्यात श्रीलंकेकडून जबर पराभव पत्करावा लागला. न्युझीलंडविरुद्धची लढत ९७ धावांच्या मोठ्या फरकाने आपल्या संघास जिंकून देतांना श्रीलंकेच्या समरवारीने शानदार शतक ठोकले होते. त्याच्या त्या कामगिरीची पुनरावृत्ती भारताविरुद्ध खेळतांना जुन्या-जाणत्या जयसूर्याने (९८) केली अणि आपल्या संघास ५० षटकांत ५ बाद ३०७ धावांचा पल्ला गाठून दिला. न्यूझीलंडविरुद्धचा सामना जिंकणाऱ्या भारतीय खेळाडूंना हे नवे आव्हान मात्र अजिबात पेलले नाही आणि संपूर्ण संघ फक्त १६८ धावांत तंबूत परतला. श्रीलंकेच्या अष्टपैलू मथ्युजने २० धावात ६ बळी घेऊन आपल्या संघाच्या नावावर भारताविरुद्धच्या



सर्वात मोठ्या विजयाची नोंद केली, हा लाजिरवाणा पराभव म्हणजे धोनी व त्याच्या सहकाऱ्यांना मिळालेली जबर चपराकच होती. ती मिळाल्यानंतर मात्र भारतीय संघ लगेच सावरला आणि नंतर स्पर्धेच्या अंतिम लढतीत श्रीलंकेस नमवून 'कॉम्पॅक करंडका'चा मानकरीही ठरला. सदाबहार सचीन तेंडुलकरचे घणाघाती शतक आणि हरभजनसिंगची प्रभावी गोलंदाजी (५६ धावांत ५ बळी) ही या सामन्याची प्रमुख वैशिष्ठ्ये ठरली. अर्थात अनुभवी राहुल द्रविड व युवराजसिंगचा किंचीत अपवाद वगळता बाकी बहुतेक सर्व भारतीय फलंदाजांची कामगिरी या विशिष्ट स्पर्धेत तशी निराशाजनकच झाली आणि खराब क्षेत्ररक्षणाची जोड मिळाल्यामुळे तर एकवेळ श्रीलंकेतून रिकाम्या हातांनीच परतण्याचा धोका धोनीपुढे उभा राहिला होता. सुदैवाने तो टळला असला तरी आता दक्षिण आफ्रिकेत सुरु असलेल्या 'चॅम्पियन्स करंडक' स्पर्धेत भारताची कामगिरी कशी होणार, याबद्दल जाणकारांच्या मनात तरी निश्चितच शंका निर्माण झाल्या आहेत.

## इंग्लंडवर डाव उलटला

ॲशेस मालिकेत रिकी पॉन्टिंगच्या ऑस्ट्रलिया संघास २-१ असे आश्चर्यकारकरित्या नमविणाऱ्या ॲण्ड्रयु स्ट्रॉसच्या इंग्लीश संघाची नंतर मर्यादित ५० षटकांच्या मालिकेत मात्र साफ दाणादाण उडाली. ही मालिका ६-१ अशी पूर्णपणे एकतर्फी जिंकतांना ऑस्ट्रेलियाच्या रिकी पॉन्टिंग, मायकेल हसी व मायकेल क्लार्क या अनुभवी त्रिमूर्तीप्रमाणे कॅलम फर्गसन, होपस्, वॅटसन व जॉन्सन या नवोदितांनीही सुरेख खेळाचे दर्शन घडविले आणि 'ॲशेस'च्या पराभवाचा चांगलाच बदला घेतला. विशेष म्हणजे या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांत पॉन्टिंग उतरला नसतांनाही ऑस्ट्रेलियाच्या विजय मालिकेत जराही खंड पडला नाही. अर्थात या यशाचे अजीर्ण झाल्यामुळे की काय, मालिकेचा अंतिम सामना मात्र ऑस्ट्रेलियाने अकारणच गमावला आणि मग आपल्या पारंपारिक प्रतिस्पर्ध्यांवर ७-० अशी मात करण्याची ऐतिहासिक सुवर्णसंधीही त्यांच्या हातून निसटली.



## नव्या 'ग्रॅण्ड स्लॅम' वीरांचा उदय

यंदाची अमेरिका खुली टेनिस स्पर्धा संस्मरणीय ठरली त मुख्यतः किम क्लित्जर्सचे जबरदस्त पुनरागमन आणि पुरष गटाचे अजिंक्यपद पटकावण्याचा पराक्रम गाजविणाऱ्या युआन मार्टिन डेल पोत्रो या युवा खेळाडूच्या उदयामुळे ! या वर्षांतील ही शेवटची 'ग्रॅण्ड स्लॅम' स्पर्धा सुरू झाली तेव्हा त्यातील संभाव्य विजेते म्हणून विल्यम्स भगिनी, दिनारा साफिना, ॲडी मरे, नदाल आणि अर्थातच 'वर्ल्ड नंबर वन' रॉजर फेडरर यांच्याकडे पाहिले जात होते. परंतु स्पर्धा संपली ती मात्र किम क्लित्जर्स व पोत्रो यांच्या गळ्यात अनुक्रमे महिला व पुरूष



गटाच्या विजेतेपदाची माळ टाकूनच ! खरे तर २००५ साली विवाहबंधनात अडकल्यामुळे आंतरराष्ट्रीय टेनिसमधून निवृत्त झालेली क्लित्जर्स पुनरागमनानंतरच्या या पहिल्याच स्पर्धेत बाजी मारेल, अशी कल्पना कोणी स्वप्नातही केली नव्हती, परंतु सेरेना व व्हीनस या बलदंड विल्यम्स भगिनींचे आव्हान सहजपणे मोडून काढल्यानंतर क्लित्जर्सचा विजेतेपदाचा मार्ग आपोआपच मोकळा झाला आणि ही 'सुपर मॉम' चक्क आपल्या चिमुकल्या कन्येच्या साक्षीने अजिंक्यपदाची मानकरी ठरली. 'न भुतों म्हणावा असा हा पराक्रम गाजवून ती आपले 'ग्रॅण्ड कम बॅक' साजरे करीत असतांना अमेरिका 'टीन एजर' मिलानी औदिनही रसिकांची मने जिंकून गेली. 'ऑलिम्पिक विजेती' एलिना डिमेनटेवा 'सुपरस्टार' शारापोवा आणि नादिया पेत्रोवा या तीन अव्वल प्रतिस्पर्ध्यांना नमविणाऱ्या औदेनची आगेकूच अखेर उपांत्यपूर्व फेरीत रोखली ती डेन्मार्कच्या कॅरोलिन बोझनियाकीने टेनिस जगतातील ही नवी तारका अखेर महिला गटाची उपविजेती ठरली. दरम्यान, भारताचे एकमेव आशास्थान असलेली सानिया मिर्झा मात्र नेहमीप्रमाणे एकेरीप्रमाणे दुहेरीतही पहिल्या-दुसऱ्या फेरीतच पराभूत झाली आणि पुरूष दुहेरीत बुजुर्ग लिएँडर पेसने जिंकलेले विजेतेपद हीच काय ती भारतीय टेनिसपटूंच्या अपयशाची एकमेव सोनेरी किनार ठरली.

आजवर सर्वाधिक पंधरा ग्रॅण्डस्लॅम अजिंक्यपदे मिळविणारा रॉजर फेडरर हाच यावेळीही 'हॉट फेवरिट' होता, परंतु अंतिम फेरीत त्याला अर्जेंटिनाच्या साडेसहा फुटी पेत्रोने अनपेक्षितपणे मात दिली. अर्थात हा पराक्रम गाजविण्यापूर्वी उपांत्य फेरीत रॅफेल नदालचे आव्हान मोडून काढून त्याने आपल्या अफाट गुणवत्तेची चुणूक निश्चितच दाखविली होती. जागतिक क्रमवारीत गेली ३-४ वर्षे सातत्याने पहिल्या एक-दोन क्रमांकावर असणाऱ्या फेडरर व नदाल या दोन्ही अव्वल व सर्वोत्तम खेळाडूंना एका स्पर्धेत हरविणारा पेत्रो हा आजवरचा पहिलाच युवा टेनिसपटू ठरला आहे. त्याच्या उदयामुळे आता आंतरराष्ट्रीय टेनिसमधील एकंदर चुरस व रंगत वाढण्यास खुप मोठा हातभार लागेल, अशी अपेक्षा आहे.

डेव्हीस करंडक स्पर्धेत भारताची आगेकूच ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धांत भारताचे टेनिसपटू फारसे चमकत नसले तरी डेव्हीस करंडक स्पर्धेत मात्र ते भल्या-भल्यांना नामोहरम करतात, असा इतिहास आहे. यंदा या इतिहासाची सुखद पुनरावृत्ती घडली ती दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर. तेथे झालेल्या पात्रता फेरीत भारताच्या सोमदेव देबबर्मन-बोपन्ना व युकी भांबरी या 'उगवत्या चेहेऱ्यांनी' यजमान संघावर ४-१ अशी दणदणीत मात केली आणि तब्बल अकरा वर्षांनंतर प्रथमच आपल्या संघास जागतिक गटांत पोचविले. लिएँडर पेस व महेश भूपती हे दोन्ही अनुभवी वीर दुखापतींमुळे उपलब्ध नसल्याने यावेळी भारतीय संघ चांगलाच अडचणीत आला होता, परंतु सोमदेवने पुरुष एकेरीचे दोन्ही सामने जिंकून 'हम भी कुछ कम नही' हे निर्विवादपणे दाखवून दिले आणि तमाम देशवासियांना एक वेगळाच आनंद दिला.



## पंकज अडवाणीची कमाल

भारतीय क्रीडाशौकिनांना अभिमान वाटेल अशी आणखी एक कामगिरी झाली ती स्नुकर व बिलियर्डस्‌चा बादशहा पंकज अडवाणीकडून इंग्लंडमध्ये झालेल्या जागतिक बिलीयर्डस् स्पर्धेत



गतविजेत्या माइक रसेलला (जो सध्या जगातील सर्वोत्कृष्ट बिलियर्डपटू मानला जातो) २०३०-१२५३ असे सहज हरवून पंकजने अक्षरशः एक नवा इतिहासच घडविला आहे. या प्रकारचे अव्वल यश मिळविणारा तो केवळ दुसरा भारतीय होय. यापूर्वी २००६ मध्ये असा पराक्रम गाजविला होता. अर्थात २००५ व २००८ मध्ये 'आयबीएसएफ वर्ल्ड चॅम्पियनशीप्स' जिंकणारा आणि २००७ प्रमाणे यंदाही आशियाची बिलीयर्डस् अजिंक्यपदे पटकावणारा पंकज सातत्यपूर्ण व जिद्दी खेळासाठीच प्रसिद्ध असून, यापुढील काळात हे गुणच त्याला यशाच्या अधिक उंच शिखरावर घेऊन जाणार आहेत.

## मुष्टीयोद्धा विजेंदरची चमक

बीजिंग ऑलिम्पिकमध्ये ब्राँझपदक पटकावणारा मुष्टीयोद्धा विजेंदरसिंग मिलान येथे झालेल्या जागतिक स्पर्धेतही ब्राँझचा मानकरी ठरला आहे. अशी कामगिरी बजावणारा तो पहिला



भारतीय असून बीजिंगमधील त्याचे यश हे अपघाती नव्हते यावर या नव्या विजयाने शिक्कामोर्तब केले आहे.

## राजसिंग डुंगारपुर यांचे निधन

भारतीय क्रिकेटचे एक थोर शिल्पकार राजसिंग डुंगारपूर नुकतेच काळाच्या पडद्याआड गेले. बीसीसीआयचे सर्वेसर्वा म्हणुनच एकेकाळी सर्वदूर ओळखल्या जाणाऱ्या राजभाईंनी निवड समितीचे अध्यक्ष, संघव्यवस्थापक आणि उत्तम समीक्षक म्हणून भारतीय क्रिकेटची जी सेवा केली त्याला खरोखरच तोड नाही. आपल्या कारकिर्दीची सुरुवात मध्यमगती गोलंदाज म्हणून करणाऱ्या या दिलदार आसामीने पुढे क्रिकेटलाच आपले जीवन सर्वस्व बनविले आणि भारतीय क्रिकेटला जगाच्या नकाशावर मानाचे स्थान मिळवून दिले.



## नरेंद्र मोदींचा क्रिकेट प्रवेश

गुजराथचे वादग्रस्त 'फायर ब्रॅण्ड मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी आता गुजराथ क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदावर



कब्जा केला आहे. संघभावनेचे महत्व सांगणाऱ्या या खेळाच्या माध्यमातून आपण समाजपरिवर्तन घडविणार आहोत, अशी ग्वाही देत मोदी या नव्या अधिकारपदावर आरूढ झाले आहेत. अर्थात संघभावना हा विशिष्ट शब्द वापरतांना त्यांच्या मनात नेमका कोणता 'संघ' आहे, हे कळायला मात्र मार्ग नाही.

## जस्टिन हेनिनचे पुनरागमन

यशाच्या सर्वोच्च शिखरावर असतांना सोळा महिन्यांपूर्वी अगदी अचानकपणे निवृत्त झालेली 'टेनिस स्टार' जस्टिन हेनिन



हार्डिन लौकरच पुनरागमन करणार आहे. आपली देशभगिनी किम क्लित्जर्सने अमेरिकन ओपन मध्ये नुकत्याच गाजविलेल्या पराक्रमापासून प्रेरणा घेऊन तिने हा निर्णय घेतला असावा, असे मानले जाते. अर्थात तिच्या पुनरागमनामुळे महिला टेनिसचे विश्व अधिक बहुरंगी-बहुढंगी बनणार आहे, हे मात्र निश्चित !

## हद्द सेरेनाच्या अखिलाडूपणाची

प्रत्येक सामना खेळायचा तो जिंकण्यासाठीच ही जिद्द उत्तमच परंतु त्याचा अतिरेक झाला तर मात्र संबंधित खेळाडूला बदलौकिक व दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागते. यंदा अमेरिकन ओपनमध्ये सुपरस्टार सेरेना विल्यम्सला नेमका हाच अनुभव आला. स्पर्धेच्या उपांत्यफेरीत आपली प्रतिस्पर्धी किम क्लित्जर्स वरचढ ठरत आहे, हे लक्षात आल्यावर सेरेनाने रॅकेटची आदळआपट आणि आरडाओरडा सुरू केला. विशेष म्हणजे तेवढेच करून ती थांबली नाही तर लाईन्समन व मॅचरेफरींवर अपशब्दांचा मारा करण्यापर्यंत तिची मजल गेली. अखेर या बेशिस्त, अखिलाडू वर्तनामुळे तिला हा सामना तर











गमवावा लागलाच पण दहा हजार डॉलरचा दंडही भरावा लागला, तिच्यावर ही कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांनी 'नो प्लेअर जि बिगर दॅन द गेम' हेच सिद्ध करून दिले आहे.

## चॅलेंजर करंडक स्पर्धा सुरू

मर्यादित पन्नास षटकांच्या सामन्यांचा 'जगज्जेता कोण' हे ठरविण्यासाठी सध्या दक्षिण आफ्रिकेत 'चॅलेंजर करंडक स्पर्धा' सुरू आहे. आत्तापर्यंत सात-आठ सामने झाले असून, त्यापैकी सलामीच्या लढतीत यजमान दक्षिण आफ्रिकेस सहज हरवून श्रीलंकेने पहिल्या खळबळजनक निकालाची नोंद केली आहे. त्यांच्या या विजयाचे मानकरी ठरली ती मुख्यतः सलामीवीर दिलशान व फिरकी गोलंदाज मेंडिस ही दुक्कल ! त्यापैकी दिलशानने चक्क शतक ठोकले तर मेंडिसने ३५ ते ४० धावांतच प्रतिस्पर्धी संघाचे स्मिथ कॅलिससह चार खंदे फलंदाज बाद केले.

या पराभवाचा वचपा नंतर द. आफ्रिकेने न्यूझीलंडला हरवून काढला, पार्नेर-स्टेनच्या भेदक गोलंदाजीमुळे न्यूझीलंडचा डाव फक्त २१५ धावांत गुंडाळला गेल्यानंतर जयमानांनी ५ गडी गमावून विजयाचे लक्ष्य पार केले. डी व्हिलर्सच्या नाबाद ७० धावा हे या सामन्याचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले.

तिसरा सामना पाकिस्तान व वेस्ट इंडिज दरम्यान झाला. या स्पर्धेत खेळणारा वेस्ट इंडिज संघ पूर्णपणे नवोदितांचा आहे, परंतु पाकिस्तानच्या प्रभावी गोलंदाजीपुढे जेमतेम १३५ धावा जमवू शकलेल्या या संघाने नंतर पाकचे पाच खंदे फलंदाज 'स्वस्तात' बाद करून सामना चुरशीचा बनविला. पाकचे युवा खेळाडू उमर अकमल व महंमद अमीर यांनी अनुक्रमे फलंदाजी व गोलंदाजीत चमक दाखवून पाकजी बाजू सावरली.

सलामीच्या लढतीत द. आफ्रिकेसारख्या प्रबळ संघास नमविणारा श्रीलंकेचा संघ नंतर तुलनेने दुबळ्या मानल्या जाणाऱ्या इंग्लंड व न्यूझीलंड या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांविरूद्ध हरला आणि स्पर्धेबाहेर फेकला गेला. जयसूर्या, जयवर्धने मुरलीधरन व खुद्द कर्णधार संगाकार या अनुभवी वीरांची निराशाजनक कामगिरी हेच श्रीलंकेच्या धक्कादायक अपयशाचे प्रमुख कारण ठरले. त्याचप्रमाणे यजमान द. आफ्रिकेची कामगिरी सुमार दर्जाची झाली आणि श्रीलंका व इंग्लंड या दोन संघांकडून पराभूत होण्याची वेळ त्यांच्यावर आली.

पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानने भारतीय संघाला पहिल्याच लढतीत पराभवाचा जबर धक्का दिला आहे. त्यातून धोनी व त्याचे सहकारी कसे सावरतात, यावरच आपले या स्पर्धेतील भवितव्य अवलंबून राहील. पाहू या काय होते ते.... !

■■■